**नि.फौ.के. नं. ८५/२०२३**
**महाराष्ट्र शासन वि.प्रथमेश सोगम व इतर**
**निशाण क्र. ३४**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु</u> –**

**नाव** – सचिन पर्शुराम बेलकर
**वय –** ३० वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**राहणार –** दाभोळे बेलकरवाडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

०१. दाभोळे बेलकरवाडी येथे श्री निनाई देवीचे मंदीर आहे. त्या मंदिरातील घंटा चोरीस गेली होती. दिनांक ३१.०७.२०२३ रोजी पोलिस तेथे पंचनाम्याकरीता आले होते. तेथे मंदिराचे मानकरी व इतर लोक हजर होते. तेथे मी व दिपक खंडागळे, शांताराम बेलकर, बाळकृष्ण पडयार, गणपत बेलकर व इतर असे आम्ही हजर होतो.

०२. तेथे दुपारी १:०० ते २:०० च्या दरम्यान पोलिसांनी सर्व मंदिराची पाहणी केली. त्याबाबत पोलिसांनी नोंद केली. तो भाग पोलिसांना शांताराम बेलकर व आम्ही दाखविला. तेथे पोलिसांनी पंचनामा केला. मला आता दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर घटनास्थळी जसे होते त्याप्रमाणे आहे (सदर पंचनाम्यास **<u>नि. ३५</u>** देण्यात आली.)

**<u>आजरोजी तिनही आरोपी हजर आहेत. आरोपी क्र. १ व २ यांचे वकिल तसेच आरोपी क्र. ३ चे वकिल गैरहजर आहेत. आम्हाला साक्षीदाराला काही विचारायचे नाही असे आरोपींनी नमूद केले. आरोपींचे विधीज्ञ गैरहजर असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३०९(२) अन्वये साक्षीदाराचा उलटतपास नाही व उलटतपासाशिवाय प्रकरण पुढे चालेल असा आदेश करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA
Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA Date: 2025.01.21 17:53:02 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक २१.०१.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. J. Bhongale (Jr. Clerk) |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 21/01/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 21/01/2025 |
| Evidence uploaded on | :- | 21/01/2025 |